दै. पुण्यनगरी दि. १७.०७.२०२४

# ५ गोवंशासह दोन वाहने जप्त

**नांदेड/प्रतिनिधी**

जिल्ह्यात भोकर व हदगाव तालुक्यातील तामसा येथे दोन चारचाकी वाहने, ५ गोवंश असा एकुण ११ लाखांचा ऐवज पोलिसांनी जप्त केला आहे.

भोकर येथील जुन्या स्टेट बँकेसमोर आंबेडकर चौकातून बस स्थानकाकडे जाणाऱ्या रस्त्यावर दि. १७ जुलै रोजी सायंकाळी ७ वाजता ५ लाख रुपयांच्या एम.एच.२६ बी.ई.६३२५ क्रमांकाच्या महिंद्रा लोडिंग वाहनात १४ हजार ५०० रुपये किंमतीचे गोवंश जातीची ३ जनावरे विना परवाना आखुड दोरीने बांधून त्याना ईजा होईल अशा स्थितीत क्रुरतेने वागणूक देण्यात आली. या प्रकरणी पोलीस नायक राजेश्वर गुंडेवार यांच्या तक्रारीवरुन रवी मेंढके, २२, चालक, रा.आमदरी ता.भोकर जि.नांदेड याच्याविरुद्ध भोकर पोलीस ठाण्यात २४५/२४ नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. जमादार कंधारे अधिक तपास करीत आहेत.

हदगाव तालुक्यातील तामसा येथील भोकर रोडवर लक्की धाब्यापाशी विजय सुरोसे २०, चालक, रा.ढाणकी, ता.उमरखेड जि.यवतमाळ याने दि.१७ जुलै रोजी दुपारी २.३० वाजता ५ लाख रुपये किंमतीच्या एम.एच.२८ बी.बी.०३९२ क्रमांकाच्या बोलेरो पिकअप वाहनात ७० हजार रुपये किंमतीचे दोन गोवंश असा एकुण ५ लाख ७० हजार रुपयांचा ऐवज पोलिसांनी जप्त केला. या प्रकरणी तामसा पोलीस ठाण्यात जमादार प्रकाश कबले यांच्या तक्रारीवरुन गुन्हा दाखल करण्यात आला आहे. जमादार नागरगोजे अधिक तपास करीत आहेत.